# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ०५/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

२)

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (त्त्ह्ड्ड्त्दढ़) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०५.१२.२०२२ | पुण्यनगरी पा. नं. १० | “शिवरायांचा जन्म कोकणात झाल्याच्या वक्तव्यानंतर प्रसाद लाड यांची दिलगिरी | इतर | |
| २. | ०५.१२.२०२२ | पुढारी पु. पा .०३ | सराईत आरोपीला मांडवी पोलिसरंनी ठोकल्या बेडया | मांडवी | |
| ३. | ०५.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०५ | ज्युचंद्र रेल्वे फाटकावर वाहतूककोंडीची समस्या | वालीव | |
| ४. | ०५.१२.२०२२ | सामना पा. नं .०७ | उद्यानाच्या भुखंडावर कब्जा करण्याचा विकासकाचा घाट | मिरारोड | |
| ५. | ०५.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०४ | सेवानिवृत्त पोलिसांचे गुरूवारी आझाद मैदानात आंदोलन | इतर | |
| ६. | ०५.१२.२०२२ | लोकमत पु. पा.०१ | वरसावे उड्डानपूल होणार २० फ्रेब्रुवारी पर्यंत खुला | मि.भा.व.वि. | |
| ७. | ०५.१२.२०२२ | लोकमत पा. नं. ०३ | पैशांच्या लोभाने गमावले साडेबारा लाख | भाईंदर | |
| ८. | ०५.१२.२०२२ | लोकमत पु. पा. ०२ | धारावी किल्ला परिसरात अनैतिक प्रकारांना ऊत | उत्तन | |
| ९. | ०५.१२.२०२२ | लोकमत पु. पा. ०२ | ठाकरे गटाच्या पदाधिका-यांची शेड तोडली | मिरा-भाईंदर | |
| १०. | ०५.१२.२०२२ | म.टा.पु. पा.०१ | किल्ल्यावर गांजा ओढणा-या दोघांवर गुन्हा | उत्तन | |
| ११. | ०५.१२.२०२२ | सकाळ पु. पा.०४ | वसईला बेकायदा होर्डिंगचा विळखा | वसई-विरार | |

पुण्यनगरी पा.नं.१०

# 'शिवरायांचा जन्म कोकणात झाल्या'च्या वक्तव्यानंतर प्रसाद लाड यांची दिलगिरी

**मुंबई** : 'कोकण ही छत्रपती शिवाजी महाराजांची कर्मभूमी' ऐवजी 'जन्मभूमी' असे अनवधानाने बोलून गेलो. त्याचवेळी त्याची दुरुस्तीही केली. यात शिवरायांचा अवमान करण्याचा प्रश्नच नाही. तरीही कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, तर मी जाहीर दिलगिरी व्यक्त करतो, अशा शब्दांत भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी रविवारी माफी मागितली. 'हे प्रकरण वाढवण्यामागे केवळ राजकारण असून त्यामागे राष्ट्रवादी काँग्रेसच आहे,' असा आरोपही त्यांनी केला.

लाड यांच्याकडून शनिवारी 'स्वराज्यभूमी कोकण महोत्सव' कार्यक्रमात बोलताना शिवरायांचा जन्म कोकणात झाल्याचे वक्तव्य केले गेले. यानंतर रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लाड यांच्या वक्तव्याचा निषेध करत त्यांच्यावर पक्षातील विविध नेत्यांकडून जहरी टीका करण्यात आली.

## निव्वळ राजकारण : लाडांनी राष्ट्रवादीवर फोडले खापर



त्याबाबत खुलासा करताना ते म्हणाले, बोलताना माझ्याकडून अनवधानाने 'शिवरायांची कर्मभूमी कोकण' असे म्हणण्याऐवजी 'शिवरायांची जन्मभूमी कोकण' असे म्हटले गेले. त्याचे राष्ट्रवादीकडून दुसऱ्या दिवशी राजकारण केले गेले. शिवरायांचा अवमान करण्याचा माझा हेतू नव्हता. तरीही कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो. लाड यांच्या वक्तव्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेससह भाजपचे खासदार उदयनराजे भोसले तसेच स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी लाड यांना लक्ष्य केले. बाळासाहेबांची शिवसेनेच्या मंत्र्यांनीही लाड यांच्या वक्तव्याबाबत नाराजी व्यक्त करत शिवरायांची बदनामी कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही, असा इशारा दिला.

राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी म्हणाले, भाजपच्या नेत्यांकडून शिवरायांबाबत वारंवार वेगवेगळी वक्तव्ये केली जात आहेत. हे जाणीवपूर्वक सुरू आहे. भाजपचे हे लोक उद्या शिवरायांचा जन्म सुरतला झाला, असेही सांगतील! शिवरायांबाबत अशी चुकीची वक्तव्ये करणाऱ्यांची जीभ छाटली पाहिजे, अशी टीका राष्ट्रवादीच्या नेत्या रूपाली पाटील यांनी केली. खासदार अमोल कोल्हे यांनीही लाड यांच्या वक्तव्याबाबत आणि शिवरायांबाबत त्यांना असलेल्या माहितीबाबत कोपरापासून हात जोडले.

औरंगजेब, अफजल खानाने सुपारी दिल्याप्रमाणे हे लोक शिवरायांवर बदनामीचे रोज घाव घालत आहेत. शिवरायांचा जन्म महाराष्ट्रातच झाला हे तरी या उपटसूंभ लोकांना मान्य आहे काय?' अशी टीका शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी लाड आणि भाजपवर केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही भाजपला लक्ष्य करताना शिवरायांचे महत्त्व कमी करण्यासाठी जाणूनबुजून बदनामीचे षड्यंत्र आखले जात असल्याचे म्हटले. वाचाळवीरांना भाजपने प्रशिक्षण द्यावे, असा टोला स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांना लगावला. शिवरायांचा अवमान सहन करणार नाही, आता आरपारची लढाई लढू, असे सांगत आझाद मैदानात आंदोलन करण्याचा इशारा देणाऱ्या उदयनराजे भोसले यांनीही लाड यांच्यावर टीका केली.

# सराईत आरोपीला मांडवी पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

घरफोडी , दरोडा, मोबाईल चोरी, खुनाचा प्रयत्न करणाऱ्या सराईत आर-ोपीला मांडवी पोलिसांना यश मिळाले असून त्या आरोपीवर काशीमीरा आणि मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल होते. याबाबतीत अधिक माहिती अशी आहे की, गेल्या १७ नोव्हेंबर रोजी मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नालेश्वरनगर भागातील एका घराच्या किचनचे ग्रील तोडून त्या घरांमधून मोबाईल, रोख रक्कम आणि ए टी एम कार्ड असा मुद्देमाल अज्ञात चोराने घरफोडी करून चोरून नेल्याची घटना घडली होती. याबाबत मांडवी पोलीस गुन्हे शाखेकडून तपास सुरू होता. या तपासात मोबाईलच्या आय एम ई एम आय चे प्राप्त झालेल्या सी डी आर नुसार अब्दुल रहमान ताहीर बड्डू , २८ या पेल्हार येथे राहणाऱ्या हॉटेल डिलिव्हरी बॉयचे काम करणाऱ्या आरोपीला ३ नोव्हेंबर रोजी वरील मोबाईल व इतर चोरी केलेल्या मोबाईलसह ताब्यात घेण्यात आले होते. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर करून ५ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी मिळवण्यात आली होती. मात्र सदर आरोपी हा पोलीस ठाण्यातील पहिल्या मजल्यावरील स्लायडिंग खिडकीतून उडी मारून ३ नोव्हेंबरच्या रात्री अंधारात पसार झाला होता. पोलिसांनी मोठ्या शर्थीने तपास करून त्याला भामटपाडा आणि कोपरच्या जंगलात स्थानिकांच्या मदतीने दिवस रात्रीच्या शोधानंतर पुन्हा ताब्यात घेण्यात आले आहे. त्याने मांडवी, काशिमीरा पो.ठा. हद्दीतील घरांमध्ये आणि मंदिरांमध्ये चोरी केल्याचे कबूल केले असून २०१४ साली त्याच्यावर लूक आऊट सर्क्युलर नोटीस ही जारी करण्यात आली होती. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

← पुढारी पु.पा.३०

पुढारी पा-नं.५.

# जुचंद्र रेल्वे फाटकावर वाहतूककोंडीची समस्या

खानिवडे : पुढारी वृत्तसेवा

नायगाव पूर्वेच्या जूचंद्र रेल्वे फाटक परिसरात सातत्याने होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मागे तुटलेल्या फाटकामुळे तासंतास नागरिकांचा खोळंबा झाला होता. नायगाव पूर्वेकडील बाजूस जूचंद्र परिसर आहे त्याभागातून बापाणे ते नायगाव असा नायगाव स्थानक व महामार्गाला जोडणारा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्याच्या मधूनच वसई ते दिवा लोहमार्ग गेलेला आहे. त्या लोहमार्गावरून मालवाहतूक गाड्या व प्रवासी वाहतूक गाड्या सुरु असतात.

## बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भर

रेल्वे फाटक उघडल्यानंतर अनेक वाहनचालक वाहने मध्येच घेऊन येत असल्याने समोरून ये जा करणाऱ्या वाहनांना जाण्याचा मार्ग बंद होतो. स्वत: पुढे जाण्याच्या नादात आणखीन २० ते २५ वाहनांची कोंडी होत असते. या अशा प्रकारच्या बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत भर पडली आहे. अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

यासाठी जुचंद्र येथे रेल्वे फाटक बसविण्यात आले आहे. मात्र मालवाहतूक गाड्या व प्रवासी वाहतूक गाड्या यांची संख्या वाढली असल्याने फाटक हे वारंवार बंद करावे लागत आहे. त्यामुळेनागरिकांना ये जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दुसरीकडे वाहनांची संख्याही भरमसाठ वाढली असल्याने फाटक बंद झाल्यानंतर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. त्यात आता नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणारा उड्डाण पूल ही वाहतुकीला खुला झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरून वाहनांची वर्दळ अधिकच वाढली आहे. याशिवाय जूचंद्र रेल्वे फाटक परिसरात उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे रस्ता ही अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत अधिक भर पडली आहे. रेल्वे मार्गातून एक गाडी जात नाही तोवर दुसरीगाडी येते. अशा वेळी फाटक बंद होत असल्याने नागरिकांचा खोळंबा होऊ लागला आहे. विशेषत: सकाळ संध्याकाळ कामावरून ये जा करण्याच्या वेळेत प्रवाशांचे अधिक हाल होत असतात.



सामना पा.नं. ७

# उद्यानाच्या भूखंडावर कब्जा करण्याचा विकासकाचा घाट

## स्थानिकांना मारहाण करणाऱ्या बिल्डरच्या बाउन्सरवर गुन्हा

भाईंदर, दि. ४ (सा.वा.) - मीरा रोड येथील शासनाच्या म्हाडा कॉलनीत असलेल्या उद्यानाच्या भूखंडावर कब्जा करण्याचा विकासकाने घाट घातल्याचा प्रकार समोर आला आहे. बिल्डरच्या गुंड व बाऊंसरने उद्यान सर्वसामान्यांच्या वापरासाठी बंद केले आहे. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या स्थानिकांना येथील सुरक्षा रक्षक व बाऊंसनरे जबर मारहाण केली. यामध्ये दोघे जखमी झाले असून याप्रकरणी बाऊंसरविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



मीरा रोडच्या सृष्टी परिसरातील म्हाडा इमारतीमधील रहिवाशांसाठी उद्यान बनवले आहे. गेल्या काही वर्षांपासून या परिसरातील रहिवासी, मुले या उद्यानात सकाळ, संध्याकाळ जातात. याठिकाणी मुले खेळत असताना येथील एका विकासकाच्या बाउन्सरने मुलांना उद्यानाबाहेर काढून उद्यान बंद केले. तेव्हा स्थानिक रहिवाशांनी हे उद्यान बंद का केले याचा जाब विचारण्यासाठी बाऊंसरकडे गेले. त्यावेळी रहिवासी आणि रवी ग्रुपचे जयेश शाह या विकासकाच्या सुरक्षा रक्षक, बाउन्सर यांच्यामध्ये उद्यानाच्या वापरावरून वाद झाला. यावेळी स्थानिकांनी विरोध केल्याने बाउन्सरने लोखंडी सळी फेकून मारली. यामध्ये १७ वर्षांचा मुलगा व एक नागरिक जखमी झाला. जखमी व्यक्तींनी काशिमिरा पोलिस ठाण्यात नितेश सुरजन, विशाल व झोया या तीन बाउन्सरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. उद्यान पुन्हा सुरू करण्यात यावे विकासकावरही गुन्हा दाखल करावा अशी रहिवाशांनी मागणी केली आहे.

### झाडे तोडली.. पालिका प्रशासनाकडून कानाडोळा

विकासकांच्या गुंडांकडून जेसीबीच्या साहाय्याने या भूखंडावरील २५ ते ३० वर्ष जुनी झाडे तोडण्यात येत आहे, त्यांच्यावर मात्र पालिकेकडून कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासन याकडे कोणाच्या आशीर्वादाने कानाडोळा करत आहे, असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

पुढारी पा.नं. ४

# सेवानिवृत्त पोलिसांचे गुरुवारी आझाद मैदानात आंदोलन

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सेवानिवृत्त पोलिसांच्या प्रलंबित मागण्यांबाबत कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देय रक्कम मिळालेली नाही. निवृत्तीनंतर आरोग्याच्या समस्या उदभवतात. त्यामुळे आरोग्य कुटूंब योजना लागू करा, या प्रमुख मागणीसाठी मुंबई पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी गुरुवारी (दि.८) आझाद मैदानावर लक्षवेधी आंदोलन करणार आहेत, अशी माहिती सेवानिवृत्त पोलीस संघटनेचे मुंबई अध्यक्ष मोहन तोडकर यांनी रविवारी दिली.

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार सेवानिवृत्त पोलिसांच्या समस्यांबाबत कोणतीच दखल न घेतल्याने सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी राज्यातील १९ जिल्हयांत एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करुन सरकारला जागे करणार आहेत.

१ जानेवारी २०१६ पासून सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे देय असलेली सर्व प्रकारची रक्कम मिळालेली नाही, ती मिळावी. आरोग्य कुटूंब योजना लागू करा, पोलीस भरतीमध्ये पोलिसांच्या मुलांना प्राधान्य देऊन भरती करुन घ्यावे, वेतननिश्चिती अशा मागण्या सेवानिवृत्त पोलिसांच्या आहेत. आझाद मैदानात सकाळी.११ वाजता आंदोलनाला सुरुवात होणार असून सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे. सेवानिवृत्तांना येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी हे आंदोलन केले जाणार आहे.

लोकमत ५.५१.१



वरसावे येथील नवीन पूल व संलग्न मार्गिकांच्या कामांचा आढावा घेताना खासदार राजन विचारे व संबंधित अधिकारी.

# वरसावे उड्डाणपूल होणार २० फेब्रुवारीपर्यंत खुला

## खासदारांनी केली रस्तेकामांची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एक्स्प्रेस इन-फाउंटन हॉटेलसमोरील घोडबंदर मार्गावरच्या सर्व्हिस मार्गाचे काम सुरू झाले आहे. वरसावे पूल व संलग्न रस्त्यांच्या कामांचा आढावा खासदार राजन विचारे यांनी घेतला. यावेळी २० फेब्रुवारीपर्यंत मुंबई-सुरत महामार्गावरील नवीन उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केला जाणार असल्याचे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिले आहे. अनेक वर्षांपासून वरसावे येथील खाडी वरच्या जुन्या पुलांची दुरवस्था वाहतूककोंडीला कारणीभूत ठरली आहे.

वरसावेनाका परिसर नागरिकांच्या नाराजीचा मोठा केंद्रबिंदू ठरला आहे. खासदार राजन विचारे यांनी या पुलाच्या व परिसरातील रस्त्यांच्या कामांची शुक्रवारी सायंकाळी पाहणी केली. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी मुकुंदा अत्तरडे, वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता कांबळे, उपअभियंता सुरेश परदेशी, माजी गटनेत्या नीलम ढवण यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, शहरप्रमुख लक्ष्मण कांदळगावकर, जयराम मेसे, शिवशंकर तिवारी, जितेंद्र पाठक, ग्राहक कक्षाचे सदानंद घोसाळकर आदी उपस्थित होते.

लोकमत पा-नं ३०

# पैशांच्या लोभाने गमावले साडेबारा लाख

## भाईंदरमध्ये भोंदूबाबा विरोधात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पैशांचा पाऊस पाडून ४० कोटी रुपये मिळवून देण्याच्या भूलथापा देत विविध विधींच्या नावाखाली साडेबारा लाख उकळल्याचा धक्कादायक प्रकार भाईंदरमध्ये उघडकीस आला आहे. पोलिसांनी भोंदूबाबा विनोद आचार्य याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

राई गावातील सदानंदनगर येथे राहणारे प्रदीप महादेव पाटील हे आजारी पत्नीला २०१९ मध्ये बाबाकडे घेऊन गेले होते. हा बाबा नालासोपाऱ्याच्या पश्चिमेला शिवम इमारतीत राहतो. तेथे गेल्यावर या बाबाने तुमच्या पत्नीला बरे करेन व तुमच्या घरी पैशांचा पाऊस पाडून ४० कोटी रुपये मिळवून देईन, असे सांगितले. प्रदीप यांनी त्यावर विश्वास ठेवून त्याने सांगितल्याप्रमाणे घरी विधी ठेवला. प्रदीप यांच्याकडून तीन लाख रुपये घेऊन त्याने ते एका खोक्यात ठेवले. २१ दिवस त्या कपड्याच्या गाठोड्याला हात लावायचा नाही व मी आल्यावर ४० कोटींचा पाऊस पाडून देईन असे सांगून बाबा तेथून गेला होता. त्यानंतर त्याने आणखी साडेनऊ लाख उकळले.

लोकमत ५.५.२.

# धारावी किल्ला परिसरात अनैतिक प्रकारांना ऊत

## प्रशासनाचे दुर्लक्ष; गडप्रेमींकडून संताप

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर येथील चौक समुद्रकिनारी असलेल्या धारावी किल्ल्यात मद्यपान-धूम्रपानासह अनैतिक प्रकार सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. किल्ल्याच्या साफसफाईदरम्यान दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे आणि निरोधही सापडल्याने गडप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे.

धारावी किल्ला हा पुरातन असून, पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत येतो. महापालिकेने धारावी किल्ल्याच्या काही भागांत चिमाजी अप्पा यांचा पुतळा, उद्यान आदी विकसित केले आहे. काही वर्षांपासून शिवप्रेमी व गडप्रेमींनी धारावी किल्ल्याच्या स्वच्छतेची नियमित मोहीम चालवली आहे. पालिकेने किल्ला दत्तक घेण्याची तयारी दर्शवून निधीची तरतूद केली. खासदार राजन विचारे व आमदार गीता जैन यांच्या पाठपुराव्याने सरकारनेही किल्ल्याच्या पुनर्विकासासाठी निधी मंजूर केला.

महापालिकेने वास्तूचे पावित्र्य राखण्यासाठी सूचना फलकही लावून घेतले आहेत. किल्ल्यावरील मद्यपान, धूम्रपान आदी प्रकार सातत्याने घडत असल्याची दखल नुकतीच राज्य मानवी हक्क आयोगाने स्वतःहून घेतली.

यानंतरही रविवारी श्रेयश सावंत, राहुल पानपट्टे, विनोद देसाई, शुभम ढोके, निखिल पाटील आदी गडप्रेमींना किल्ल्यात साफसफाई करताना दारूच्या बाटल्या, सिगारेट- गुटख्याची रिकामी पाकिटे व थोटके आणि निरोधची पाकिटे सापडली. पोलिस आणि महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष किल्ल्याचे पावित्र्य नष्ट करण्यास कारणीभूत आहे.

यापुढे गडप्रेमींना असे गैरकृत्य करताना कोणीही आढळल्यास त्याला चांगलाच चोप देण्यात येईल व पुढे काही झाल्यास त्याची जबाबदारी पोलिस आणि पालिकेची असणार आहे, असा इशारा सावंत यांनी दिला.

### म्हणणे मांडण्यासाठी पालिकेला हवा वेळ

- राज्य मानवी हक्क आयोगाने धारावी किल्ला परिसरातील अस्वच्छतेची दखल घेतली असून, धारावी किल्ल्याबाबत आयोगासमोर महापालिकेने माहिती दिली आहे. मात्र, सविस्तर माहिती देण्यासाठी पालिकेने वेळ मागितला आहे.
- आयोगाने याप्रकरणी मीरा-भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालय व ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनाही त्यांचे म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. १३ डिसेंबरला यावर सुनावणी होणार आहे.

# ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्याची शेड तोडली

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर येथील आणखी एका शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकारी पवन घरत यांच्या शेडवर शुक्रवारी महापालिकेने कारवाई केली. पालिका अधिकारी हे आकसातून ही कारवाई करत असल्याचा आरोप घरत यांनी केला आहे.

मीरा रोडच्या कनकिया परिसरात स्थानिक भूमिपुत्रांच्या मालकीच्या जमिनी आहेत. त्यावर महापालिकेच्या विकास आराखड्यात शाळा व अन्य आरक्षणे असली तरी पालिकेने ही जागा मोबदला देऊन ताब्यात घेतलेली नाही. त्यामुळे मोकळ्या जागेवर स्थानिक तरुणांनी तात्पुरत्या स्वरूपात हॉटेल, टर्फ यासाठी शेड उभारून व्यवसाय सुरू केला आहे. महापालिकेने शुक्रवारी कोणतीच नोटीस न देता अचानक सर्व शेड, टर्फ तोडून टाकल्याचा आरोप ठाकरे गट युवा नसेनेचे मीरा-भाईंदर शहरप्रमुख पवन घरत केला आहे.

म.टा. ५.५.१.

# किल्ल्यावर गांजा ओढणाऱ्या दोघांवर गुन्हा

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

उत्तनच्या जंजिरे धारावी किल्ल्यावर गांजा ओढणाऱ्या दोघा स्थानिक तरुणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तन सागरी पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली. हे प्रकार रोखण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने कायमस्वरूपी सुरक्षारक्षकाची नेमणूक करावी, अशी मागणी आता शिवप्रेमींकडून होत आहे.

भाईंदर पश्चिमेला असणाऱ्या ऐतिहासिक जंजिरा धारावी किल्ल्यावर काही शिवप्रेमी शुक्रवारी रात्री गेले होते. यावेळी दोन तरुण किल्ल्याच्या परिसरात नशा करताना दिसून आले. यासंबंधीची माहिती शिवप्रेमींनी उत्तन सागरी पोलिसांना दिल्यानंतर या दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. या दोघांचीही वैद्यकीय चाचणी केली असता, यात त्यांनी गांजा ओढल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी उत्तन पोलिसांनी दोघांविरोधातही एनडीपीएस कायद्याअंतर्गत शनिवारी गुन्हा दाखल केला. शनिवारीही किल्ल्यावर काही प्रेमी युगुल बसल्याचे पाहायला मिळाले. तर, काही जण हे लघुशंका करत असल्याचे दिसून आले. यापूर्वी किल्ल्यावर दारूच्या बाटल्यांचा खच आढळून आला होता. असे प्रकार रोखण्यासाठी समुद्रालगत असणाऱ्या किल्ल्याच्या परिसरात कायमस्वरूपी सुरक्षारक्षक नेमण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

सकाळ पु. पा. ०४.

# वसईला बेकायदा होर्डिंगचा विळखा



## २ कोटी ६० लाख

इतके महापालिकेला अधिकृत होर्डिंगच्या माध्यमातून एप्रिल ते ऑक्टोबर महिन्यात उत्पन्न मिळाले आहे.

## पालिकेचे जाहिरात धोरण कागदावरच

वसई, ता. ४ (बातमीदार) : वसई-विरार शहर महापालिकेचे क्षेत्र विस्तारत आहे, पण शहराला बेकायदा जाहिरातींचे फलक आणि होर्डिंगचा विळखा पडला आहे. हे होर्डिंग महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता उभारल्याने पालिकेला उत्पन्न मिळत नाही; तर दुसरीकडे महापालिकेचे जाहिरात धोरण निश्चित न झाल्याने हा विळखा अधिक घट्ट बसू लागला आहे.

वसई-विरार शहरात मुख्य वर्दळीचे मार्ग, औद्योगिक वसाहत, तसेच अंतर्गत रस्ते, स्कायवॉक, सार्वजनिक ठिकाणी दर्शनी भागात जाहिरात करण्यासाठी स्पर्धा सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, वाहने, बांधकाम क्षेत्र यासह विविध उत्पादन क्षेत्राशी निगडित असणारे व्यावसायिक उत्पादनाची जाहिरात करता यावी म्हणून शहरातील होर्डिंग्जना पसंती देत असतात. मात्र अनेक होर्डिंग्ज हे महापालिकेची परवानगी न घेता थाटात उभे केले जातात.

वसई-विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. त्यामुळे हा परिसर बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे आपले उत्पादन हेच सर्वोत्तम आहे, हे पटवण्यासाठी उत्पादकांकडून जाहिरातींचे फलक आणि होर्डिंगचा आधार घेतला जात आहे; परंतु अनेक होर्डिंग्ज हे पालिकेची परवानगी न घेता उभारले जात आहेत. यामुळे महापालिकेला उत्पन्नापासून मुकावे लागत आहे, पण महापालिकेचे जाहिरात धोरण निश्चित न झाल्याने अनधिकृत फलकबाजी करणाऱ्यांचे फावले आहे.

### शहराचे विद्रुपीकरण

वसई-विरार शहरातील मुख्य रस्ते, उड्डाणपूलाचे खांब, विजेचे खांब, पथदिव्यांवर मोठ्याप्रमाणात बॅनर लावण्यात आले आहेत. यामुळे शहराचे विद्रुपीकरण झाले आहे. त्यामुळे या अनधिकृत बॅनर तसेच होर्डिंगवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी महापालिकेकडे केली आहे.

वसई-विरार शहरात अनधिकृत होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर कारवाई केली जात असते. तसेच जे व्यक्ती, संस्था परवानगी घेऊन होर्डिंग्ज लावतात त्यांच्याकडून जाहिरात स्वरूपात कर आकारला जात आहे. एप्रिलपासून दोन कोटी वसुली झाली आहे. लवकरच जाहिरात धोरण निश्चित केले जाणार आहे.
- अनिलकुमार पवार, आयुक्त

### ...तर जबाबदार कोण?

जाहिरातीची परवानगी घेणाऱ्यांना युनिक कोड, नोंदी केल्या जातील, अशी घोषणा चार वर्षांपूर्वी करण्यात आली; पण जाहिरात धोरण अद्याप निश्चित झाले नाही. दुसरीकडे परवानगी न घेता उभारण्यात येणारे होर्डिंग्ज पडून दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा सवाल आता नागरिकांतून केला जात आहे.